पुणे
# पुण्य नगरी
● वर्ष : ९ ● अंक : ११ ● मंगळवार, ५ फेब्रुवारी २००८ ○ पाने ८+८=१६, किंमत २.०० रुपये

# 'पोलिसांनी व्यायामाद्वारे मनाचे संतुलन राखावे'



पोलीस परेड ग्राउंडवर पोलीस कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. अमरसिंह निकम

पिंपरी ४ (प्रतिनिधी)- पोलिसांनी दररोज नियमित योग व प्राणायाम, व्यायाम यांच्या साहाय्याने मनाचे संतुलन राखण्याची आवश्यकता आहे, असे विचार येथील डॉ. आदित्य होमिओपॅथिक रुग्णालयाचे संचालक डॉ. अमरसिंह निकम यांनी पुणे येथे व्यक्त केले.

पोलीस परेड ग्राउंडवर व्याख्यानात ते बोलत होते. त्या वेळी रवींद्र सेनगावकर, राखीव पोलीस केंद्र व पोलीस अधिकारी उपस्थित होते.

ते म्हणाले, की सध्याच्या परिस्थितीत महाराष्ट्रातील पोलिसांच्या मनावर चोवीस तास मानसिक तणाव व कामाचा प्रचंड बोजा आहे. त्यामुळे पोलिसांमध्ये आत्महत्येचे प्रमाण वाढले आहे. मानवी शरीराची किंमत प्रचंड असून त्याची जोपासना करणे आवश्यक आहे.

या वेळी त्यांनी विविध आजारांवर होमिओपॅथी औषधे उपयुक्त असल्याचे सांगितले. प्रास्ताविक व आभार पोलीस उपायुक्त सेनगावकर यांनी केले.